International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिलांचे योगदान : एक अभ्यास

**महेश ज. साखरे[1], डॉ संजय एस. गायकवाड[2]**
[1]संशोधक विद्यार्थी , पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
[2]संशोधक मार्गदर्शक, विभागप्रमुख, इतिहास, एम.एच.एम. कला
व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब, सोलापूर
**Corresponding Author: महेश ज. साखरे**
**DOI- 10.5281/zenodo.14649741**

**सारांश :**

साधारणतः इ.स.1946 च्या बेळगाव येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून मराठी भाषा बोलणाऱ्यांचे मराठी भाषिक राज्य असावे अशी मागणी केली गेली व या मागणीतून पुढे मराठी भाषिक इलाख्यांमध्ये संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उदयास आली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर मात्र मराठी भाषिकांचे राज्य स्थापन करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्यास जोमाने सुरुवात झाली. या चळवळीस सर्व जाती धर्माच्या, पंथाच्या, विविध बोली भाषा बोलणाऱ्या लोकसमुदायाचा पाठिंबा होता. शिवाय तत्कालीन विविध राजकीय पक्ष आणि त्यांचे राजकिय नेतृत्व, विद्यार्थी, साहित्यिक, कलाकार, महिला इ.चा. सहभाग संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत होता. पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी देखील या चळवळीत आपल्या परीने सहभाग घेऊन हि चळवळ यशस्वी करण्यास हातभार लावला.

**प्रस्तावना :**

भाषावार प्रांतरचनेची मागणी ब्रिटिश काळात पुढे आली. काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या प्रमुख राजकीय कार्यक्रमात भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचा समावेश केलेला होता. इ.स.1928 च्या नेहरू अहवालात देखील भाषावर प्रांतरचनेचा मागणीचा अंतर्भाव करण्यात आला होता. मुंबई इलाखा, मध्यप्रदेश, हैदराबाद संस्थानातील सर्व मराठी भाषिक प्रदेशाचे एकत्रिकरण करून संयुक्त महाराष्ट्र निर्माण करावा असे मराठी जनतेला वाटत होते. लोकांच्या इच्छेतूनच संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही पुढे आली. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी आचार्य विनोबा भावे, धनंजयराव गाडगीळ, प्रबोधनकार के.सी.ठाकरे, ग.त्र्यं.माडखोलकर, लालजी पेंडसे, एस.एस. मिरजकर, दत्तो वामन पोतदार इत्यादी मान्यवर व्यक्तींनी देखील स्वातंत्र्यपूर्वकाळात मराठी भाषिक संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेची आवश्यकता प्रतिपादित केली होती. देशाच्या स्वातंत्र्यानंतर भाषिक तत्वावर आधारित प्रांतरचनेच्या मागणीने जोर धरला. विशेषतः मराठी जनतेने संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करून संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी तत्कालीन केंद्र सरकारकडे करण्यास सुरुवात केली. या मागणीस पुढे 01 मे 1960 रोजी यश प्राप्त झाले आणि मुंबई शहरासह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

**संशोधनाचे उद्देश :-**

1. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिलांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
3. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील महिला शाहिरांच्या योगदानाचा आढावा घेणे.

**गृहिततथ्य :-**

1. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महिलांनी सक्रियपणे सहभाग घेतला .
2. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महिला शाहिरांनी आपल्या शाहिरी काव्याद्वारे चळवळीचा प्रचार प्रसार केला.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला गेला आहे.

**तथ्य संकलन पद्धती :**

सदर संशोधनाकरिता अनेकविध ऐतिहासिक संदर्भ साधनांचा वापर केला गेला आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महिलांच्या योगदानाचा आढावा घेण्याकरीता तत्कालीन ग्रंथांचा, कागदपत्रे, स्थानिक वृत्तपत्रे, मासिकांचा वापर करून तथ्य संकलन केले आहे.

**महत्वपूर्ण शब्दावली :**
भाषावार प्रांतरचना, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, शाहिरी, वग, फार्स, इ.

**संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी अकरा प्रांतात या देशाची विभागणी केली होती. ही रचना करीत असताना भौगोलिक स्थिती, भाषा, संस्कृती या घटकांचा विचार न करता आपले प्रशासन योग्य कसे चालेल याचाच विचार करून प्रांत हे एकमेकांशी जोडले

गेले. त्याचा परिणाम म्हणून एकाच प्रांतात विविध भाषा बोलणारे लोक समाविष्ट झाले. तत्कालीन मुंबई प्रांतामध्ये मराठी, गुजराती, कन्नड, सिंधी इत्यादी भाषा बोलणारे लोक समाविष्ट होते. यामुळे साहजिकच मराठी भाषिकांची विभागणी ही बॉम्बे प्रेसिडेन्सी, सेंट्रल प्रोविसेस अँड बेरार व निजामी संस्था अशा विभागात झालेली होती.

भारतात ब्रिटिश राजवट असताना इसवी सन 1912 च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सिंध प्रांत मुंबई इलाख्यातून अलग करावा तसेच तेलुगु भाषिकांचे वेगळे भाषिक राज्य असावे असे सुचविले गेले. इ.स.1920 च्या काँग्रेसच्या अधिवेशनात देशाच्या स्वातंत्र्यानंतर भाषावर प्रांतरचनेचे तत्व स्वीकारून त्यानुसार भाषानिहाय प्रांताची नव्याने रचना केली जावी हे तत्व मान्य केले गेले होते. परंतु यावरील तत्वाचे अंमल न झाल्याने मराठी भाषिकांवर अन्याय केला जात आहे असे दिसत होते. यामुळे मराठी भाषिकांसमोर स्वतंत्र भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी लढा देण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नव्हता.

पुढे 15 ऑगस्ट 1947 नंतर देशात समान भाषा भौगोलिक संलग्नता विचारात घेऊन राज्यांची पुनर्रचना करणे हे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे भिन्न भाषिकांची एकाच राज्यात घुमसट होऊ लागली. यास मुंबई राज्य ही अपवाद नव्हते. मुंबई राज्यात मराठी, कानडी, गुजराती भाषिक प्रदेश समाविष्ट होता. तर हैदराबाद राज्यात मराठी, तेलगु, कन्नड भाषिक प्रदेश तर मध्य प्रांतात हिंदी, मराठी, भाषिक जनतेचा समावेश केलेला होता. थोडक्यात, दक्षिण भारतात बहुतांश राज्य ही बहुभाषिक होती. त्यामुळे प्रशासन, शिक्षणाचे माध्यम यात गोंधळ व अडचणी निर्माण झाल्याचे दिसून येते. या सर्वांचा परिणाम म्हणूनच सर्व भाषिकांमध्ये शासनाविरुद्ध असंतोष घुमसत होता. त्यामुळे देशभर भाषिक तत्वावर आधारित राज्यांची मागणी करणारी आंदोलने उभी राहू लागली. यातच तत्कालीन राजकीय नेतृत्वांनी मराठी भाषिकांचा महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी संघर्ष केलेला दिसून येतो.

**संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील महिलांचे योगदान :**

देशावर प्रेम करावे आणि स्वराज्याला आपले मंत्र मानावे असा उपदेश 01 मे 1960 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी नवमहाराष्ट्र राज्याच्या निर्मितीप्रसंगी तमाम मराठी जनतेला दिला आणि पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ चळवळी नंतर तमाम मराठी माणसाचे स्वप्न पूर्ण झाले. मुंबईसह मराठी भाषिक संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा काही सोपा नव्हता. देशाच्या स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी वाढीस लागली आणि इसवी सन 1946 पासून मराठी भाषिक राज्याची मागणी करणारी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. संयुक्त महाराष्ट्रासाठी मुंबईसह राज्यातील विविध भागांमध्ये विशेषतः सीमाभागात जी आंदोलने सुरू झाली आणि या आंदोलनात स्त्रियांचा सुद्धा लक्षणीय सहभाग होता.संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा एकंदरीत आढावा घेतला असता दार कमिशन 1947, जे.वी.पी. समिती 1948, फाजल अली कमिशन अहवाल अर्थातच राज्य पुनर्रचना आयोग, नागपूर करार 1953 या सर्व घडामोडी दरम्यान या चळवळीत स्त्रियांनी सक्रिय सहभाग हा नोंदवलेला नव्हता. परंतु चळवळीच्या मध्यानंतर 10 ऑक्टोंबर 1955 मध्ये राज्यपुनर्रचना आयोगाने द्विभाषिक विशाल मुंबई राज्याची घोषणा केली तेव्हा राज्यभरात याच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महिलांनी भाग घ्यायला सुरुवात केली.

या चळवळीतील स्त्रियांचा सहभागाचा आढावा घेतला असता या चळवळीत मृणालताई गोरे, अहिल्या रांगणेकर, कॉम्रेड गोदाबाई परुळेकर, कॉम्रेड मीनाक्षीताई साने, प्रमिला दंडवते, सुधा काळजाते, अनुताई लिमये, रुक्मिणी केळुस्कर, तारा रेड्डी इत्यादी महिला नेत्यांनी मुंबई राज्याच्या विविध भागातील स्त्रियांना या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी घेण्यास प्रोत्साहन दिले. कॉम्रेड तारा रेड्डी, कॉम्रेड अहिल्या रांगणेकर यांनी गिरणगाव व मुंबईतील विविध भागांमधील महिलांना या आंदोलनात उतरविले. सत्याग्रह, घेराव आदींमध्ये त्यांचा सहभाग हा लक्षणीय होता. सरकारच्या त्रिराज्य योजनेविरुद्ध 18 नोव्हेंबर 1955 रोजी निघालेल्या मोर्चामध्ये प्रल्हाद केशव अत्रे, सेनापती बापट, लालजी पेंडसे, मधु दंडवते यांना अटक करण्यात आली. वरील प्रमुख नेत्यांना अटक झाल्याचे कळताच अस्वस्थता निर्माण झाली. या अटकेचा निषेध करण्यासाठी देखील सत्याग्रही स्त्रियांची तुकडी सक्रिय होती. याच दरम्यान तारा रेड्डी, सुनंदा देसाई, प्रमोदिनी ताई शेटे, निर्मला कुलकर्णी या महिला नेत्यांना देखील अटक झालेली होती. साताऱ्यातील कराडचा विचार करता येथे मंगलाबाई पवार यांच्या नेतृत्वात सुखते गावातून 100 बैलगाड्यांमधून 500 ते 600 स्त्रियांनी मोर्चा काढला. यावेळी अंजली पाटील, शालन पाटील, प्रेमला काकी चव्हाण यांची भाषणे झाली. शिवाय दिल्लीतील पार्लमेंटच्या समोर मुंबईसह मराठी भाषिक संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जे आंदोलन झाले त्यात मराठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. शांता रानडे, कमल भागवत, अनुताईंनी टिळेकर, पार्वतीबाई वैद्य, एरंडे अन्नपूर्णा भांडारकर, इत्यादी महिला नेत्यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभाग होता.या लढ्यात केवळ सत्याग्रह आंदोलने मोर्चे संप इत्यादीच्या माध्यमातूनच स्त्रियांनी आपले योगदान तर दिलेच त्याशिवाय महिला शाहिरांनी देखील आपल्या शाहिरी, पोवाडे, काव्ये इत्यादींच्याद्वारे या चळवळीत आपले योगदान दिले. महिला शाहिरांमध्ये इंद्रायणी बाई पाटील, अनुसयाबाई आनंदराव शिंदे, लिलूताई म्हापणकर, कुसुमताई गायकवाड. बी. नीलप्रभा, केशर जैनू चांद यांचा समावेश होता. शाहीर अनुसयाबाई शिंदे यांना तर तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी त्यांना हदगाव तालुक्यातून

हद्दपार केले होते. त्यामुळे त्या इतर भागात जाऊन आपला कार्यक्रम सादर करताना म्हणत.

" एक पाय तुमच्या गावात I दुसरा तुरुंगात किंवा स्वर्गात
तमा नाही याची अनुसयाला I
मुंबई सहसंयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे I
त्याचसाठी वाणीचा हिला चेतविला I"

या महिला शाहिरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे विचार महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवून स्त्रियांना या लढ्यात सहभागी होण्यास प्रवृत्त केले. चळवळीदरम्यान जनजागृती करत समाजाचे प्रबोधन केल्यामुळे ह्या संपूर्ण आंदोलनाची व्याप्ती ही दिवसेंदिवस वाढीस लागली आणि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती जवळ दिसून आली. 01 मे 1960 रोजी भारतीय संघराज्यात मुंबईसह मराठी भाषा बोलणाऱ्या तमाम जनतेचा संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आला.

कम्युनिस्ट नेत्या अहिल्याबाई रांगणेकर यांना " संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील रणरागिनी " असे म्हटले जाते. प्राचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी अहिल्याबाई रांगणेकर यांच्यावर कविता रयत रणरागिणी रचले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महिलांना मोठ्या प्रमाणावर सहभाग घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे श्रेय अहिल्याबाई रांगणेकर यांच्याकडेच जाते. याशिवाय ऐतिहासिक वारली आदिवासी आंदोलनाच्या नेत्या गोदावरीबाई परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली लासरी, उंबरगाव, डांग, गुजरात सीमेवरील भागात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन करण्यात आले. कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांच्यामुळे आदिवासींनी देखील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोठा सहभाग घेतला. कॉम्रेड मीनाक्षीताई साने यांनी सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या परिसरात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रचार आणि प्रसार केला. एका बाजूला राजकीय चळवळीत असणाऱ्या महिला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय सहभागी होत्या तर दुसऱ्या बाजूला दुर्गा भागवत, इस्मत चुगताई यासारख्या तत्कालीन महिला साहित्यिकांनी देखील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपले योगदान दिले.

इस्मत चुगताई या भारतातील विसाव्या शतकातील सर्वात महत्त्वाच्या स्त्रीवादी लेखिकांपैकी एक म्हणून ओळखले जातात. त्या प्रसिद्ध उर्दू लेखिका व चित्रपट निर्मात्या होत्या. त्यांचा संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील योगदान देखील महत्त्वाचे मानले जाते इ.स.1915 मध्ये उत्तर प्रदेशात जन्म झालेल्या चुगताई या सामाजिक समस्यांवरील प्रगतिशील विचारांसाठी ओळखले जात होत्या. चुगताई यांनी या काळातील अनेक सामाजिक नियमांना आवाहन दिले तर होतेच याशिवाय संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये सक्रिय सहभागी होत्या आणि त्यांनी सर्व मराठी भाषिक प्रदेशांना एका राज्याखाली एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील त्यांचे योगदान आणि एक साहित्यिक म्हणून त्यांच्या साहित्यिक रचना वारसा हा महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील लेखक आणि कार्यकर्त्यांच्या नवीन पिढींना प्रेरणा देत आहे यात शंका नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ज्याप्रमाणे पुरुष शाहिरांनी उदाहरणार्थ पिराजीराव सरनाईक, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर साबळे, शाहीर विश्वासराव फाटे, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अजीज नदाफ इत्यादींनी आपल्या शाहिरी काव्य कला पथकांच्या द्वारे योगदान दिले त्याचप्रमाणे महिला शाहिरांनी कुसुमताई गायकवाड, इंद्रायणी पाटील, अनुसयाबाई शिंदे, लिलूताई म्हापणकर इत्यादींनी देखील पुरुषांच्या खांद्यास खांदा लावून त्यांच्यासोबत बरोबरीनेच आपल्या शाहिरीद्वारे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीविषयीत आपले योगदान दिले. संपूर्ण महाराष्ट्रात फिरून त्यांनी या चळवळीचा जोमाने प्रचार प्रसार केला. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन फक्त पुणे, मुंबई, नाशिक, ठाणे इत्यादी भौगोलिक क्षेत्रापुरतेच मर्यादित न ठेवता त्याला गावागावात, घराघरात पोहोचविण्याचे श्रेय महिला शाहिरांनाच दिले पाहिजे. या चळवळीस मराठा भाषिकांच्या स्वाभिमानाचे प्रतीक त्यांनी बनविले. शिवाजी पार्कवर भरलेल्या सभेत भाई एस.एम. जोशी, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, प्रल्हाद केशव अत्रे यांच्यासमोर इंद्रायणी पाटील यांनी संवादरूपी दीडशे ओळींचा डांगचा पोवाड्याचे गायन केले यासाठी इंद्रायणी पाटील यांचे सभेस उपस्थित असणाऱ्या वरील मान्यवरांनी कौतुक केले तसेच पुढे मुंबई शहरात जेवढ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभा झाल्या त्या प्रत्येक सभेत इंद्रायणी पाटीलांनी शाहिरीच्याद्वारे उपस्थित लोकांमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या प्राप्तीसाठी त्यांचे आत्मभान जागृत केले आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील पहिली महिला शाहीर म्हणून मान्यता मिळालेले आणखीन एक महाराष्ट्र कन्या अर्थातच शाहीर अनुसयाबाई शिंदे यांना ओळखले जाते. परभणी जिल्ह्यातील कळमनुरी हे त्यांची जन्मभूमी. लहान वयातच त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभाग नोंदविला. लहानपणापासूनच लढण्याची जिद्द बाळगणाऱ्या अनुसयाबाई शिंदे या संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यापासून दूर राहणे शक्य नव्हते. त्यांच्या शाहिरीची झलक पाहूनच त्यातील ज्वलंतपणामुळे मुरारजीभाई देसाई यांनी तेथून त्यांना हद्दपार केले. परंतु अनेक ठिकाणाहून त्यांना हद्दपार केल्यानंतरही मुंबईसह मराठी भाषिक संयुक्त महाराष्ट्रासाठी त्यांची शाहिरी तेजाने तळपत राहिली. संयुक्त महाराष्ट्रासाठी त्यांची एक शाहिरी खालीलप्रमाणे-

"महाराष्ट्र देश हा न्यारा, हा तर भारतभूचा तारा "
याचे गाऊ या गुणगान I ही तर शूरवीरांची खाण I
ही तर भारतभूची शान I"
"तापला रक्त अंगात I वेड माथात, जोम हातात I
संयुक्त महाराष्ट्र करणार I जनता सारी जागृत करणार I
आया बहिणी ही सामील होणार I "

वरीलप्रमाणे वीररसपूर्ण पोवाडे, गीते, वग, काव्यांद्वारे महिला शाहीर इंद्रायणी पाटील यांनी आपल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा प्रचार प्रसार जोमाने केला.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील आणखीन एक महिला शाहीर म्हणून नाशिकच्या कुसुमताई गायकवाड यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. मुंबईत आल्यानंतर अनेक शाहिरांशी त्यांची ओळख झाली. यात शाहिरांचे महामेरू म्हणून ओळखले जाणारे शाहीर अमर शेख, अण्णाभाऊ साठे यांची नावे प्रकर्षाने घ्यावी लागतात. शाहीर अमर शेखांनी त्यांना गाणी शिकविले. आपल्या शाहिरींच्याद्वारे कुसुमताईंनी नाशिक परिसरात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या जोरदार प्रचार प्रसार केला. लोकांमध्ये जनजागृती केली.

या शिवाय लिलुताई म्हापणकर यांनी देखील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविला. चळवळीसाठी विविध सण व उत्सवांशी, महिलांशी निगडित संयुक्त महाराष्ट्र गीते त्यांनी रचली. यात प्रसिद्ध अशी संयुक्त महाराष्ट्राचा पाळणा, संयुक्त महाराष्ट्र समितीचा तिळगुळ कार्यक्रम, विजयश्रीचे डोहाळे आणि मोरारजी देसाईवर रचलेले “मर्डरजी” फारच प्रसिद्ध झाले. मुंबईच्या गोळीबारावर काव्य करताना ते लिहितात -

मोरारजी आला आला। गोळी घालण्याला। गोळी
घालण्याला आला। महाराष्ट्रीयाला।
अश्रुधूर सोडून त्यांनी। पोलिसास सांगे कांनी॥
सोडू नका सान थोरा। करा जलदी गोळीबारा॥
जनतेशी नाही थारा। रक्ताच्या वाहती धारा।
खुश होऊन यतो न्हाला। महाराष्ट्र घाली घाला॥

संयुक्त महाराष्ट्र समितीचे महत्त्व त्या खालील प्रमाणे विशद करतात -

तिळगुळ घ्या, मंजुळ बोला, सप्रेमे मुखी घाला।
समितीने हा हलवा सुंदर, प्रेमाने हा केला सादर।
घरोघरी वाटावा हा सत्वर, समितीचे सभासद बनवा।

वरील महिला शाहिरांनी इ.स.1957 च्या सार्वत्रिक निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी देखील संपूर्ण मुंबई राज्याचा दौरा केला. घरोघरी प्रचार केला, महिलांना जागृत केले, महाराष्ट्रात खेडोपाडी कार्यक्रम केले, आपल्या शाहिरीद्वारे जनतेत जोश निर्माण करण्याचा प्रयत्न केला, महिला शाहिरांच्या प्रचारामुळेच प्रसारामुळेच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे मराठी भाषिकांचे तमाम मराठी जनतेने पाहिलेले स्वप्न महिला शाहिरांच्याच कार्यामुळे साकार झाले असेच म्हणावे लागेल व त्याची परिणीती होऊन 01 मे 1960 रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले यात शंका नाही असेच म्हणावे लागेल.

इ.स.1956 मध्ये दादर येथील द्विभाषिक विरोधी पहिल्या परिषदेचे उद्घाटन करताना अनुताई लिमये या म्हणतात, “द्विभाषिक विरोधी भावनेचे प्रात्यक्षिक काँग्रेसचा पराभव करून जनता मतपेटीतून करून दाखवेल.” गोदावरी परुळेकरांनी निवडणुकीच्या कामातही स्त्रिया योग्य कामगिरी बजावतील अशी अपेक्षा व्यक्त केली.इ.स.1957 च्या निवडणुकीत केदारी यांनी भाई एस.एम.जोशींचा प्रचार केला तर क्रांतीताई जेजुरीकरांनी इ.स.1957 ची सार्वत्रिक निवडणूक व मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ठिकठिकाणी मोर्चे काढले, पत्रके वाटली गेली प्रचाराला जात असता पाटी पेन्सिल घेऊन जात असे. लोकांना मतदार स्त्रीयाना फुली कशी मारायची, कोणाच्या नावासमोर मारायची असे सर्व प्रात्यक्षिक देऊन निवडणुकीबाबत प्रबोधन करीत असत. तर शाहीर कुसुमताई गायकवाड यांनीही इ.स.1957 च्या निवडणुकीत समितीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी गावोगावी फिरून असंख्य शाहिरीचे कार्यक्रम केले एवढेच नव्हे तर कलापथकाला मिळणाऱ्या पैशातून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील खेडोपाड्यात कार्यक्रम घेतले.इ.स.1957 च्या सार्वत्रिक निवडणुकीत महिलांचे योगदान महत्त्वाचे तर राहिलेच त्याशिवाय या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीचे जे जे उमेदवार निवडून आले यात संपूर्ण मुंबई राज्यातून विमलाताई बागल या एकमेव महिला प्रतिनिधी म्हणून त्यांचा विजय झाला.

इ.स.1957 च्या निवडणुकीत काँग्रेसला जबर हादरा बसला आणि संयुक्त महाराष्ट्र समितीला जो अपूर्व यश मिळाला यात महिलांचा वाटा मोठा होता असे म्हणावे लागते. स्त्रियांना कमी प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले असले तरी निस्वार्थ भावनेने केवळ मराठी भाषा, महाराष्ट्र राज्य, मुंबई ही महाराष्ट्रालाच मिळाली पाहिजे, मुंबईच्या प्राप्तीसाठीची तळमळ, प्रेम, आत्मीयता यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीला मोठे यश लाभले असे म्हणावे लागेल. या लढ्यातील स्त्रियांचे योगदानाबाबत पेंडसे लिहितात, “या निवडणुकीत स्त्रियांनी अत्यंत हिरीरीने भाग घेतला, हजारोंच्या संख्येने ते यात सहभागी झाल्या. काँग्रेसवर त्यांचा इतका गैरविश्वास होता की सील केलेल्या मतपेट्यांवर पहारा देण्यासाठी स्त्रिया तुकड्या सज्ज झाल्या होत्या. इ.स.1957 च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने जे भरघोस यश मिळाले ते स्त्रियांच्या पाठिंब्यावरच. निवडणुकात अशा प्रकारचा सहभाग यापूर्वी केव्हाही दिसला नाही.”

**सारांश :**

संयुक्त महाराष्ट्राच्या या लढ्यात सर्व जाती-धर्माच्या,पंथाच्या, श्रीमंत-गरीब, विविध भाषिक, कष्टकरी कामगार, उच्चविद्याविभूषित ते निरक्षर अशा सर्वच पार्श्वभूमीतील महिलांचे योगदान राहिले आहे. या लढ्यात विविध विचारधारेच्या महिलाहि सक्रिय होत्या. जनसंघ, हिंदू महासभा, कम्युनिस्ट, समाजवादी तसेच काँग्रेस पक्षाशी

संबंधित असणाऱ्या महिलाही या लढ्यात होत्या. महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायाविरोधात एकजुटीने त्या उभ्या राहिल्या, लढ्याचे नेतृत्व केले, लोकांना या लढ्यात सामावून घेतले आणि यशस्वीरीत्या मुंबई शहरासह मराठी भाषिक संयुक्त महाराष्ट्राची प्राप्ती केली.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. लालजी पेंडसे, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, 2010
2. मांगले महेश, लढा संयुक्त महाराष्ट्राचा आणि सीमा प्रश्नाचा, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2014
3. गडकरी माधव, संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी, मनोविकास प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, 1987
4. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्र चळवळ 1948 ते 1956, खंड क्र.7, मौज प्रकाशन गृह, मुंबई, 2007
5. साने रविकिरण, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2009,
6. जगताप विजय, (संपा.) संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे| संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील गीते, पोवाडे, 2009
7. देशपांडे सुहासिनी,संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील शाहिरांचे योगदान,परिवर्तन प्रकाशन, पुणे, 2004
8. पोतदार माधव,संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान, अनुबंध प्रकाशन, मुंबई, 2010
9. खोपकर कृष्णा, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि डाव्या पक्षाचे योगदान, जनशक्ती प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, 2010
10. विमलताई बागल, चिंतन भाग एक,लोकसेवा समिती, कोल्हापूर,1994
11. विमलताई बागल, चिंतन भाग दोन,लोकसेवा समिती, कोल्हापूर,1997
12. पोवार छाया, विमलताई बागल, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, 2014
13. कोळी शोभा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे, पीएच.डी. अप्रकाशित शोध प्रबंध, 2012
14. पाटील मनीषा, रणरागिणी संयुक्त महाराष्ट्राच्या, दिशा पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2010
15. जक्कल बाबुराव, दैनिक सोलापूर समाचार, 22 मे,1956, सोलापूर,1956